सिएटल येथे जून-जुलै २००७ मध्ये संपन्न झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनानिमित्त तयार करण्यात आलेल्या विशेषांकामध्ये "**महाराष्ट्राच्या विकासाचे महामार्ग**" या विषयावर मा.ना.श्री. छगन भुजबळ, मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, यांचा लेख.



# महाराष्ट्रातील प्रगतीपथ

**छगन भुजबळ**
**मंत्री(सा.बां.),महाराष्ट्र शासन**

महाराष्ट्रातील ऐतिहासिक, भौगोलिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी लक्षात घेतली तर रस्त्यांचा सहभाग हा निर्विवादपणे अतिशय महत्त्वाचा ठरलेला आहे. महाराष्ट्रातील ऐतिहासिक राज्यकर्ते , नंतर आलेले ब्रिटिश या सर्वांनी महाराष्ट्रातील रस्त्यांचा वेळोवेळी थोड्याफार प्रमाणात विकास केलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशभर ज्या पंचवार्षिक योजना जाहीर झाल्या त्या खऱ्या अर्थाने रस्त्यांच्याबाबत अग्रक्रमावर राहिलेल्या आहेत आणि मग झालेले औद्योगिकीकरण व विकासाकडे घेतलेली झेप यामुळेच केवळ महाराष्ट्र देशाच्या कॅनव्हासवर अतिभव्यतेने उठून दिसू लागला.

महाराष्ट्राच्या झालेल्या विकासामध्ये औद्योगिक, शैक्षणिक व कृषी इत्यादी धोरणे राबविताना रस्त्यांच्या विकासाचे धोरण सुद्धा यापूर्वी राबविले गेले होते. या झालेल्या विकासाच्या अनुषंगाने रस्त्यांवरील ताण मोठ्या प्रमाणात वाढलेला आपल्याला दिसून येतो. वाढलेली वाहतूकवर्दळ लक्षात घेता अस्तित्वातील रस्ते हे आजमितीला अपुरे पडत आहेत आणि त्या अनुषंगाने राज्य शासनाने १९९६ मध्ये नवीन धोरणाचा स्वीकार करून खाजगीकरणाद्वारे रस्त्यांचा विकास हाती घेतला आहे. देशातील पहिला पुणे-मुंबई द्रूतगती महामार्ग तयार करण्याचा मान महाराष्ट्राला मिळाला. यासोबतच राज्यातील इतर महत्त्वाची शहरे यांचा सुद्धा विकास करण्याचे शासनाने ठरविले. त्या अनुषंगाने  राज्य महामार्गांचे चौपदरीकरण मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आले आहे. मागील ३ - ४ वर्षांत वाहतूकवर्दळीत झालेली प्रचंड वाढ, अद्यावत् बस, ट्रक यांना लागणारी रस्त्यांची जास्तीची रूंदी, रस्ते विकासासाठी अपुरा पडणारा निधी इत्यादींचा साकल्याने

विचार करता रस्ते विकासासाठी आक्रमक धोरण आखणे आवश्यक झाले. त्याप्रमाणे माझ्या राज्यातील महत्त्वाच्या राज्य मार्गांवर/पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिपद्वारे (PPP) रस्ते विकासाचे काम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आले आहे. जे रस्ते प्रकल्प पथकर वसुलीद्वारे सुसाध्य होऊ शकणार नाही तेथे Viability Gap Funding चे धोरण शासनाने स्वीकारले आहे. या आक्रमक विकास धोरणाचे पडसाद उमटावयास लागले आहेत. मागील २ - ३ वर्षांत राज्य रस्त्यांच्या सुमारे १००० किमीचे चौपदरीकरण सुरू झाले आहे व नजिकच्या २ - ३ वर्षांत ते पूर्ण होईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील रस्ते विकासाची आवश्यकता लक्षात घेऊन एकंदर १२१४ किमीचे चौपदरीकरणाचे काम नजिकच्या काळात हाती घेण्याचे शासनाने मान्य केले आहे. तसेच नजिकच्या काळात राष्ट्रीय महामार्गाचे ५१५ किमी चौपदरीकरण व ४०० किमी सहापदरीकरण पूर्ण झालेले दिसेल. रस्त्यांचा विकास हा सर्व सामाजिक व आर्थिक विकासाचा पाया आहे ही बाब पुन्हा एकदा यामुळे सिद्ध होणार आहे. रस्त्यांमुळे नुसतीच दोन शहरे जोडली जाणार नसून मानवी मनेही जुळली गेलेली महाराष्ट्रात दिसतील.

या २ - ३ वर्षांत आपण कधी महाराष्ट्र बघायला आलात तर महाराष्ट्राचे बदललेले स्वरूप आणि प्रगतीपथावर चालणारा कालचा महाराष्ट्र आज विकासाची प्रगती पताका फडकवताना दिसेल. अनेक वेळा महाराष्ट्रातील रस्त्यांबाबत अनेक मान्यवरांकडून टीका केली गेली आहे, परंतु एकंदर लोकसंख्येचा आवाका पाहता होत असलेली ही प्रगती निश्चितच महाराष्ट्राच्या मातीशी नाळ जुळलेल्या व्यक्तींना अभिमानास्पद वाटेल.

--- ००० ---